# मराठी साहित्य : भारतीयतेच्या संदर्भात

– डॉ. बाळकृष्णजी कानोळकर

आज मराठी भाषा ही केवळ महाराष्ट्र राज्यापुरतीच सीमित राहिलेली नसून ती बृहन् महाराष्ट्राची भाषा बनलेली आहे. आजच्या या भाषिक महाराष्ट्राच्या सीमा भारताच्या विविध राज्यातून पूर्व-पश्चिम आणि दक्षिणोत्तर वृद्धिंगत झालेल्या आहेत. उत्तरेकडे थेट ग्वाल्हेर – झांझीपासून ते दक्षिणेकडे तंजोर – मुदराईपर्यंत तर पूर्वेकडे छोटा नागपूरचे पठार ते पश्चिमेकडे बडोदापर्यंत त्या पसरलेल्या आहेत. हजारो मैलांचा हा औरस – चौरस प्रदेश एखाद्या उपखंडासारखा पसरलेला आहे. इतकेच नव्हे तर महाराष्ट्राच्या भाषिक सीमा अगदी सातासमुद्रापार आणि त्याही पलीकडे म्हणजे अमेरिकेतल्या सिलीकॉन व्हॅलीपर्यंत विकसित झालेल्या असून जवळ जवळ नऊ ते दहा कोटी लोकांची मराठी ही भाषा आहे. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर महाराष्ट्रा आणि मराठीची ही स्थिती आहे. असे असले तरीही महाराष्ट्र म्हणजे दख्खनच्या पठाराचा उत्तर गोलार्ध हे मुळातून आपण लक्षात ठेवलेच पाहिजे. आज या प्रदेशात मराठीचा वापर चालतो तिथे सुमारे हजारभर वर्षांमागे महाराष्ट्री अपभ्रंश, त्याच्याही पूर्वी महाराष्ट्री प्राकृत आणि तत्पूर्वी पैशाचीच बोलबाला होता हे कसे विसरता येणार? या प्रदेशाची ही भाषिक परंपरा आणि या भाषांतून निर्माण झालेले साहित्य अशी फार थोर परंपरा या प्रदेशाला लाभलेली आहे. या प्रदेशात मराठीपूर्व भाषांमधून निर्माण झालेल्या साहित्याला भारतीय स्वरूपाची व्याप्ती आणि अस्मिता प्राप्त झालेली होती हे विसरून चालणार नाही. उदाहरणादाखल आपण गुणाढ्याचा पैशाची भाषेतील 'गाथा सप्तशती', राजा हाल कृत 'सत्तसई', राजशेखर यांची 'प्राकृत विलासिनी', 'कर्पुर - संमजरी' आणि महाराष्ट्री अपभ्रंशातील भविसयत्त कहा (धनपाल) 'पडमचरियु' (चतुर्मूख स्वयंभू देव). जैन साधूंच्या महाराष्ट्री अपभ्रश भाषेतील कृति 'दीपवंस' व 'सहावंस', 'चुर्णिका', यांचा धांडोळा घेतल्यास मला काय म्हणायचे आहे याचा सहजपणे उलगडा होण्यासारखा आहे. या सर्वच काळातले महाराष्ट्रातले साहित्य हे भारतीय स्तरावरचे म्हणून मान्यता पावलेले आहे. त्यानंतरच्या काळातले म्हणजे अकराव्या शतकापासून ते एकोणीसाव्या शतकापर्यंतचे वाङ्मय उदाहरणार्थ 'विवेकसिंधु', 'लीळाचरित्र', 'ज्ञानेश्वरी' नामदेवादी

संताचे अभंगादी साहित्य हे भारतीय साहित्याच्या पदाला पोचलेले असून ते राष्ट्रीय वारसा ठरलेले आहे.

या पार्श्वभूमीवर आधुनिक काळातील मराठी साहित्याचा भारतीय साहित्य म्हणून विचार करत असताना आपणाला ही भाषिक-सांस्कृतिक व साहित्यिक परंपरा नजरेआड करून चालणार नाही. या साहित्याचा भारतीय साहित्य म्हणून विचार करायचा झाल्यास पुढील पाच तत्त्वांचा विचार अपरिहार्य ठरतो असे मला सुचवावेसे वाटते. ती पाच तत्त्वे म्हणजे :

१) विषय

२) आशय

३) मिथक / प्राक्कथा

४) रचनातंत्र वा आकृतिबंध व

५) भाषा

आता यातील प्रत्येक तत्त्वाचा थोडक्यात परामर्श घेऊ. एक विषयाचा विचार करता आपल्याला असे दिसून येईल की अगदी संतकालापासून ते आजपर्यंतच्या सुमारे आठशें वर्षांच्या कालामध्ये मराठी साहित्याने भारतीय वेदविद्येतून आणि लोकसंस्कृतीच्या गंगेतून अनेकानेक ज्ञानकावडींचा उपसा सातत्याने केलेला आहे. रामायण, महाभारत या महापुराणापासून ते भागवतादी इतर पुराणे आणि उपपुराणे यामधून कितीतरी कथानके / विषय मराठी साहित्याने उचललेले आहेत. त्यात राम, हनुमान, रावण, कृष्णार्जुनादी विरांच्या कथांचा आणि अहिल्या, मंदोदरी, तारा इत्यादी पतिव्रतांच्या आणि सीता, उर्मिला यांच्या कथानकांचे अवगाहन मराठी साहित्याने वेळोवेळी आणि अखंडितपणे केलेले आहे. भारतीय स्तरावर मान्यता पावलेल्या नरश्रेष्ठांचा नायक म्हणून तिने स्वीकार केलेला आहे. उदा. छत्रपती शिवाजी, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी नावे वानगीदाखल सांगता येतील. मराठीत कर्ण आणि श्रीकृष्ण यांच्या जीवनावर अनेक साहित्यकृती निर्माण झाल्या. कर्णाच्या जीवनावरच्यां मृत्युंजय, राधेय, कर्णायन, कौंतेय, महापुरुष, टाकलेलं पोर तर कृष्णाच्या जीवनावर युगंधर, स्वयंवर, द्वारकेचा राजा या साहित्य कृतींची निर्मिती झाली. सीतेच्या जीवनावर 'भूमिकन्या सीता'सारखी अजरामर आणि अजोड अशी नाट्यकृती जन्माला आली तर उर्मिलेच्या मूक व्यथेने कवी मनाला मोहिनी घातली आणि त्यातून 'उर्मिला'सारखी कविता अवतरली. 'कैकयी' व 'धाडिला राम तिने कां वनी?' या सारख्या साहित्यकृती कैकयीच्या जीवनावर लिहिल्या गेल्या तर 'थांबा रामराज्य येते आहे' सारखी विरुपिकाही इथेच निर्माण झाली. ययाती तर अनेक साहित्यकृतींचा विषय झालेला आहे. त्यात 'ययाती'. 'ययाती आणि देवयानी' यांचा समावेश होतो.

महदाइसेचे 'ढवळे' नरेंद्राचे 'रुक्मिणीहरण' दामोदराचे 'शिशुपाल वध' व. 'वछहरण'कवी डिंभ यांचे 'उखाहरण' संत एकनाथांचे 'रामायण' व 'रुक्मिणीहरण' गदिमांचे 'गीतरामायण', ज्ञानेश्वरांची 'भावार्थदीपिका' म्हणजेच 'ज्ञानेश्वरी' वामनपंडितांची 'पर्यार्यदीपिका' विनोबाची 'गीताई', असे नानाविध साहित्यग्रंथाचा 'प्रेरणा आणि विषयस्रोत' 'रामायण' आणि 'महाभारत' हे आद्य ग्रंथ आहेत.

राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान, गत इतिहास आणि पूर्वदिव्य, स्वसंस्कृती आणि तद्विषयक अभिमान यांनी अनेक प्रतिभावंताच्या प्रतिभेला वाट करून दिली. त्यातून कुंटे यांचे 'राजा शिवाजी' किर्तने यांचे 'माधवराव

पेशवे यांचा मृत्यू' इत्यादी साहित्यकृती निर्माण झाल्या. जवळजवळ संस्कृतातील सर्वच पंचमहाकाव्यांचा (नाटकांचा) मराठी अनुवाद एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात झाला.

देशाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या काळात आणि त्यानंतरच्या राष्ट्रीय उत्थानाच्या काळात याविषयावर अनेक कवींनी आणि नाटककारांनी आपली लेखणी झिजविलेली आहे. त्यात 'गर्जा जयजयकार आहे,' 'शांतिचा जयजयकार आहे,' शतकानंतर' आहे आणि 'बापुजीची प्राण ज्योति' ही आहे. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. याच काळात उच्चरवाने आणि आत्यंतिक तळमळीने केलेले 'स्वातंत्र्यता देवतेचे गान' ही आपल्याला इतर भाषांच्या बरोबरीनेच मराठीतूनही गायलेले स्पष्टपणे ऐकू येते. 'महात्मायन', 'छत्रपति शिवराय', 'गोमंतक' यासारखी महाकाव्ये आणि खंडकाव्ये निर्माण झाली तीही याच काळात. वीर वामनराव जोशी यांचे 'रणदुंदुभी' नाटक याच काळातले.

देशभर चर्चिले जाणारे स्त्रियांचे प्रश्न, बालविधवांचे प्रश्न, जरठबालाविवाहाची समस्या यांसारख्या विषयांवर इथे लक्षवेधक व दर्जेदार साहित्यनिर्मिती झालेली आहे. 'पण लक्षात कोण घेतो?' 'शारदा', 'ब्राह्मणकन्या,' कमला' इत्यादी विविध साहित्य प्रकारांतर्गत झालेली निर्मिती याची साक्ष देण्यास पुरेशी आहे. ब्रेनड्रेनज या राष्ट्रीय समस्येशी संबंधित 'संध्याछाया' (दळवी) व 'अंधारवाटा' (भेंडे) मराठी साहित्याला परिप्रेक्षात नेऊन बसवतात. अंधाधुंद भ्रष्टाचाराचे चित्रण आपल्याला 'घाशीराम कोतवाल' मधून पहायला मिळते.

इतर साहित्य प्रकारांच्या बरोबरीनेच कथा या वाङ्मय प्रकारातही भारतीयतेच्या स्पंदनाची जाणीव करून देणारी कथानिर्मिती मराठीत झालेली आहे. त्यातून 'भारतीय' हृदयाची स्पंदने आणि मनाची निःश्वसिते संवेदनशील रसिकाला ऐकू आल्याशिवाय राहत नाहीत. उदा. 'मोहोर' (ल. स.) 'वन्दे मातरम्' (वि. सु.) 'मातीची भांडी', 'ज्योतिर्मयी (वा. कृ.) 'काळ तर मोठा कठीण आला' (हरिभाऊ), 'गाठीभेटी' (पाटील), 'मानिनी', 'पर्जन्यकुंड', 'घन आणि मन' (जोशी) इत्यादी.

विचार करता कादंबरी वाङ्मयात कितीतरी उदाहरणे देता येण्यासारखी आहेत. उदा. 'पडघवली', 'शामची आई', 'बनगरवाडी', 'झाडा झडती', 'बळी' इत्यादी. खांडेकरी कादंबरी अनुवादातून दक्षिणेत विशेष लोकप्रिय झाली आहे. नाटकाचा विचार करतां 'रणदुंदुभि', 'आम्ही एकशे पाच' वगैरे नाटके स्वातंत्र्याकांक्षेची आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याची जाणीव करून देण्यासाठी रचल्याचे स्पष्टपणे जाणवते. 'किचकवध' या नाटकाविषयी तर या संदर्भात आजवर अनेकांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. एकूणच उद्‌ध्वस्त भारतीय राजकीय जीवनाचे चित्रण करणाऱ्या 'उद्‌ध्वस्त धर्मशाळा' या नाटकाला तोड नाही. यामधून जसे उत्कृष्ट भाष्य साधलेले आहे तसेच 'महानिर्वाण' सारख्या विरुपिकेने आजच्या भारतीय समाजाच्या किडलेल्या मानसिकतेचे दर्शन घडविलेले आहे. 'चार-चौघी' सारखे नाटक आजच्या भारतीय स्त्री जीवनाचे प्रतिनिधित्व करते तर 'वाडाचिरेबंदी'ने भारतीय समाजधारणेला आणि विशेषतः कुटुंबधारणेला बसणारे यंत्रयुगाचे हादरे अधोरेखित केलेले आहेत. तर सध्या देशाच्या धार्मिक आणि आध्यात्मिक जीवनात बोकाळलेल्या व्यावसायिक आणि गुंडप्रवृत्तीचे वाभाडे काढलेले 'एका स्वामीचे महानिर्वाण'सारख्या कथेतून पाहायला मिळते.

मिथकाच्या वा पुराणकथेच्या दृष्टिकोनातून विचार करता 'ययाती', 'आस्तिक', 'क्रौंचवध' या कादंबऱ्या आणि 'विद्याहरण', 'किचकवध' यासारख्या नाटकांचा अभ्यास करण्यासारखा आहे. 'देवनवरी', 'किरवंत', 'घोटभर पाणी', 'उपऱ्या' आदी दलित साहित्यकृतींतून दीन-दुबळ्या दलित समाजमनाचा उद्रेक प्रस्फोटित झालेला ऐकू येतो.

रचनातंत्राचा विचार करता आधुनिकपूर्व काळात मराठी-रचनातंत्राची खासीयत म्हणून ओवी, लावणी, पोवाडा हेच काय ते सांगता येतील. बाकी इतर सारेच छंद वा पदबंध भारतीय स्तरावर कमी-अधिक सारख्याच प्रमाणात वापरले जाताना आढळून येतात. ब्रिटिश काळात तत्कालिन शिक्षणाद्वारे आलेले अनेकविध रचनाप्रकार भारतभर अंकुरले, मराठीही त्याला अपवाद राहिली नाही. याची उत्कृष्ट उदाहरणे म्हणून ट्रॅजेडी, फार्स, ब्लँकव्हर्स ही सांगता येईल. कादंबरी हा नवाच साहित्य प्रकार रुजला आणि चांगला फोफावला. सुनीत, गजल, रुबाया, हायकू यांसारखे इतर रचनाबंधही मराठीला भारतीय परीप्रेक्षात घेऊन गेले.

Indian Literature is one though it is written in different Languages. भारतीय साहित्याच्या संदर्भात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी काढलेले हे उद्गार सर्वथैव मननीय असेच आहेत. अगदी नेमक्या शब्दात त्यांनी भारतीय साहित्याचे अंतर्बाह्य रूपविवेचन केलेले असून, भारतातल्या प्रत्येक भाषेतल्या साहित्यिकाला व साहित्याभ्यासकाला आपला व आपल्या साहित्याचा आत्मशोध घेण्यास ते प्रवृत्त करणारे आहेत. 'विविधतामें एकता' हे भारतीय संस्कृतीचे प्राणतत्त्व म्हणून सांगण्यात येते. भारतीय साहित्याच्या बाबतीत यथार्थतेने सांगायचे झाल्यास वरील शब्द फिरवून घ्यावे लागतील आणि म्हणावे लागेल की 'एकतामें विविधता' ते भारतीय साहित्याचे व्यवच्छेदक लक्षणही आहे. मराठी साहित्यातून भारतीय साहित्याच्या अनेक रंगापैकी एक रंग दृगोचर होण्यास मदत होते. सर्वच नव्हेत.

शिवाय शतकानुशतके आदानप्रदानाच्या स्वरूपात मराठी साहित्याने इतर भारतीय भाषिक साहित्यातून अनेक चांगले संस्कार आत्मसात केलेले आहेत. प्रामुख्याने बंगाली आणि कानडी भाषेच्या संबंधाने ही बाब अधिक लक्षणीय आहे. प्रारंभीच्या व अलिकडच्या काळात कानडी रंगभूमीने मराठी रंगभूमीला समृद्ध केलेले आहे तर थोड्याफार फरकाने आधुनिक रंगभूमीच्या बाबतीत बंगाली रंगभूमीच्या संदर्भात हेच म्हणावे लागेल. कादंबरीच्या बाबतीत शरदबाबूंनी तर, कवितेच्या बाबतीत रवींद्रनाथांनी मराठीतल्या त्या त्या वाङ्मयप्रकारांना काही 'आपले' असे देऊन वाढविलेले आहे. गिरीश कर्नाड, मोहन राकेश या कानडी व हिंदी भाषांमधून सकस नाट्य लेखन केलेल्या भारतीय नाटककारांचा विचारही याच संदर्भात करता येईल.

यवंच, भूप्रदेश, संस्कृती, इतिहास, परंपरा, राष्ट्रीयता, धर्म आणि उपासना, शास्त्र आणि नीतिविचार या सर्वच कसोट्यांवर पाहू जातां मराठी साहित्य हे भारतीय साहित्याच्या वटवृक्षाची एक छोटी पारंबी आहे, असेच म्हणावे लागते.

●●●